आधुनिक तंत्रज्ञानाच्या गुन्हे नियंत्रणासाठी पोलीस दलाने सज्ज व्हावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 2

नेहा बोरा यांच्या 'ब्राह्मणवाद' वक्तव्यावरुन 'इंडिया' आघाडीत वाद; सपा अन् ठाकरे गटाचा मोठा निर्णय >>पान 3

पेनटाकळी धरणावर आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकऱ्यांचा धडक मोर्चा; पाणी सोडण्याच्या मागणीने परिसर दणाणला! >>पान 4

सुविचार
जीवनात विवेकाची आवश्यकता

दैनिक
आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलढाणा ■ वर्ष 05 ■ अंक 97 ■ बुधवार, दि. 04 नोव्हेंबर 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

नारिंगी अनारकलीमध्ये तेजश्री प्रधानचा पारंपरिक अंदाज

आतील पान

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना

■ दुष्काळग्रस्तांसह गरजू रुग्णांसाठी मदतीचा नवा आधार
■ मुख्यमंत्री सहायता निधीला मिळणार नवे आर्थिक बळ

दैनिक आपला विदर्भ

मुंबई। प्रतिनिधी : राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात बाधित नागरिकांना मदत करण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांच्या उपचारांसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा, या उद्देशाने मुख्यमंत्री सहायता निधीला आता सामाजिक सहभागाचे बळ मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली आहे.

कंपन्या, संस्था, देणगीदार आणि इतर सामाजिक घटकांच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारून तो गरजू रुग्णांसह विविध आपत्तींत बाधित नागरिकांच्या मदतीसाठी वापरता येणार आहे. त्यामुळे महागड्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना अधिक आर्थिक मदत देण्याबरोबरच दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य आपत्कालीन परिस्थितीतही मदतीचा हात पुढे करता येणार आहे.

या नव्या व्यवस्थेमुळे हृदयरोग, कर्करोग, मूत्रपिंडविकार, मेंदूविकार यांसह विविध गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया, महागडे आणि दीर्घकालीन उपचारांसाठी अधिक मदत उपलब्ध करून देता येणार आहे. गरजेनुसार औषधे, वैद्यकीय साहित्य आणि उपचारासाठी आवश्यक इतर बाबींसाठीही मदत करता येणार आहे. दुर्मिळ आजारांवरील उपचारांसाठीही या माध्यमातून विशेष मदत उभारता येणार आहे.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या आढावा बैठकीत रुग्णांच्या उपचारासाठी सामाजिक दायित्वातून अतिरिक्त निधी उभारण्याच्या पर्यायांचा अभ्यास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानुसार, 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून कंपन्या, संस्था आणि देणगीदारांच्या सहभागातून उभारलेला निधी गरजू रुग्णांच्या उपचारासाठी वापरता येणार आहे. रुग्णालये, स्वयंसेवी संस्था, कंपन्या आणि सामाजिक संस्थांना गरजेनुसार एकत्र आणून विविध वैद्यकीय मदतीचे उपक्रमही राबविता येणार आहेत.

बाधित व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबीयांना मदत करता येणार आहे. गरीब नागरिकांना आवश्यक वस्तूंचे वितरण, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्थांना सहाय्य आणि सामुदायिक आरोग्य शिबिरांचे आयोजनही करता येणार आहे. आरोग्य जनजागृती, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित उपक्रमांनाही या माध्यमातून मदत करता येणार आहे.

सामाजिक सहभागातून अधिक संसाधने उभारून गरजू रुग्ण आणि आपत्तीग्रस्त नागरिकांपर्यंत मदत पोहोचविणे हा या सोसायटीचा व्यापक उद्देश आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थिती असो किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती, अशा संकटांच्या काळात सामाजिक संस्थांच्या सहभागातून मदतीचे उपक्रम या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. गरजेनुसार विविध मदतीचे उपक्रम राबविता येणार असल्याने भविष्यात मदतीची व्याप्ती वाढविता येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या नव्या व्यवस्थेमुळे गरजू रुग्ण आणि आपत्तीग्रस्त नागरिकांना मदतीचा आणखी एक आधार उपलब्ध होणार आहे. कंपन्या, संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या लोकसहभागातून अधिकाधिक गरजूंपर्यंत मदत पोहोचविता येणार आहे. या उपक्रमासाठी दात्यांनी पुढे येऊन आपले योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

भारत चीनला मागे टाकत बनणार जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था!

मुंबई : या शतकाच्या शेवटी भारत लोकसंख्येच्या बाबतीत चीन मागे टाकत जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरेल, असे भाकीत प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ जेफ्री डी. सॅक्स यांनी म्हटले आहे.

वाराणसी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'आधुनिक आव्हानांसाठी प्राचीन शहाणपण' या विषयावरील जागतिक परिसंवादात बोलताना सॅक्स म्हणाले की, जगाने आता अशा बहुध्रुवीय युगात प्रवेश काला आहे, जिथे विविध प्रदेशांमधील संस्कृती, विचार, इतिहास आणि अस्मिता समजून घेणे आवश्यक आहे. ''कोणताही एक प्रदेश किंवा कोणताही एक देश जगावर वर्चस्व गाजवणार नाही'', असे त्यांनी स्पष्ट केले.

त्यानंतरच्या संवादांमध्ये, सॅक्स यांनी अदाणी समूहाचा भारतातील बदल आणि प्रगतीच्या प्रमुख चालकांपैकी एक म्हणून उल्लेख केला आणि देशाच्या पायाभूत सुविधांच्या विकासातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. जेफ्री डी. सॅक्स पुढे कौटुंबिक मालकीच्या आणि कौटुंबिक नेतृत्वाखालील उद्योगांच्या विशिष्ट जबाबदाऱ्यांकडेही लक्ष वेधले आणि असा युक्तिवाद केला की, कुटुंबाच्या नावाने व्यवसाय करणारे व्यावसायिक हितसंबंधांपेक्षा अधिक काहीतरी दर्शवतात. ते त्यांची मूल्ये, वारसा आणि समाजाप्रती असलेली कर्तव्ये देखील सोबत घेऊन चालतात. ते म्हणाले की, अशा व्यवसायांनी ज्या समुदायांमध्ये ते कार्यरत आहेत, त्यांना ते काय परत देतात याचा विचार केला पाहिजे.

भाजपा अजूनही विरोधी पक्षाच्या मानसिकतेतून बाहेर पडलेला नाही – राज ठाकरे यांचा घणाघात

दैनिक आपला विदर्भ

मुंबई। प्रतिनिधी : सत्तेवर बसल्यानंतरही भाजपा अजून विरोधी पक्षाच्या मानसिकतेतून बाहेर पडलेला नाही, तर काँग्रेसला अजूनही विरोधी पक्षाची भूमिका कशी बजवायची हे समजलेलं नाही. सत्ता केवळ खुर्चीत नसते, ती अंगात आणि मनातही असावी लागते. सत्ताधाऱ्यांनी आपल्यावरील टीका आणि विनोद खिलाडूवृत्तीने स्वीकारायला शिकले पाहिजे. मात्र, आज व्यंगचित्रकार, पत्रकार आणि संपादकांवर बंधने आणली जात आहेत. हे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत घातक असल्याचा घणाघात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला.

पु. ल. देशपांडे यांच्यावरील व्यंगचित्र दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्यात राज ठाकरे बोलत होते. रविंद्र नाट्य मंदिरात झालेल्या या कार्यक्रमात राज ठाकरेंनी पु. ल. देशपांडे यांच्यासोबतच्या आठवणी ताज्या केल्या. यावेळी त्यांनी सत्ताधारी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला. भाजपाकडून संविधान आणि लोकशाही वाचवण्याच्या काढलेल्या रॅलीवर टीका करत राज ठाकरे यांनी एका विनोदी टिप्पणीचा दाखला दिला. भाजपाने लोकशाही वाचवा असं म्हणणं केंटुकी फ्राइड चिकनच्या प्रतीक असलेल्या म्हाताऱ्याने कोंबड्या वाचवा असं सांगण्यासारखं आहे, असा टोला त्यांनी लगावला. स्वत:च सत्तेत बसलेले असताना लोकशाही वाचविण्यासाठी मोर्चे नेमके कशासाठी आणि कोणाविरुद्ध काढत आहात, असा संतप्त सवालही राज ठाकरे यांनी विचारला.

विधान परिषद निवडणुकांच्या निकालाचा अंदाज चुकल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ट्विटचा संदर्भ देत राज ठाकरे म्हणाले, मी आजवर कोणत्याच पंतप्रधानांनी असे ट्विट केल्याचं पाहिलेलं नाही. कारण भाजपा अजूनही विरोधी पक्षाच्या भूमिकेतूनच बाहेर आलेला नाही. यावेळी त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकीय शैलीचाही दाखला दिला. बाळासाहेबांवर अनेक पत्रकार आणि संपादकांनी टीका केली; मात्र त्यांनी प्रत्येक टीकेला प्रत्युत्तर दिलंच असे नाही. टीका करणारा प्रत्येकजण आपला शत्रू नसतो, तर तो आपली भूमिका मांडत असतो, हे समजून घेण्याची गरज आहे. टीकेला कसे सामोरे जायचे, हे सत्ताधाऱ्यांनी ठरवायला हवे, असे राज ठाकरे म्हणाले.

व्यंगचित्रामुळे वर्तमानपत्रातून काढून टाकण्यासारख्या घटना घडत असतील, तर ही चिंतेची बाब आहे, असं सांगत बाळासाहेब ठाकरे यांनी तेव्हाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर व्यंगचित्र काढून त्यांनाच ते पाठवलं होतं. नेहरू यांनी त्यावर आपली सही देऊन बाळासाहेबांना शुभेच्छा दिल्या होत्या, अशी आठवण सांगितली. त्यामुळे व्यंगचित्रकार, पत्रकार किंवा संपादक हे कोणाचे शत्रू नसतात. ते केवळ आपापली भूमिका मांडत असतात. त्यांचे म्हणणे समजून घेण्याची आणि त्यावर खिलाडूवृत्तीनं प्रतिक्रिया देण्याची मानसिकता सत्ताधाऱ्यांमध्ये असली पाहिजे. परंतु, गेल्या दहा-बारा वर्षात व्यंगचित्रकार आणि पत्रकारांच्या अभिव्यक्तीवर मर्यादा आणण्याचे जे प्रकार सुरू झाले आहेत, ही संस्कृती विचित्र आणि घाणेरडी आहे. ही बाब आता कळणार नाही, कालांतराने हे सगळे गेल्यानंतर समजेल, असं सूचक विधानही राज ठाकरे यांनी केले.

कंपन्या, संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारणार; मुख्यमंत्री सहायता निधीला सामाजिक सहभागाचे बळ

मुंबई। प्रतिनिधी : दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य आपत्कालीन परिस्थितीत बाधित नागरिकांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मदत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या व्यवस्थेद्वारे कंपन्या, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या सहभागातून अतिरिक्त निधी उभारण्यात येणार आहे. हा निधी गरजू रुग्णांच्या उपचारांसह आपत्तीग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी वापरता येणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या मदतीला सामाजिक सहभागाची जोड मिळणार आहे.

आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना उपचारांसाठी मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष कार्यरत आहे. या कक्षाच्या आढावा बैठकीत रुग्णांच्या उपचारांसाठी सामाजिक दायित्वातून अतिरिक्त निधी उभारण्याच्या पर्यायांचा अभ्यास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले होते. त्यानुसार 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली आहे. या सोसायटीच्या माध्यमातून कंपन्या, संस्था आणि देणगीदारांकडून निधी उभारून तो गरजूंपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

महागड्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना अधिक आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबरोबरच दीर्घकालीन उपचारांसाठीही या निधीचा वापर करता येणार आहे. दुर्मिळ आजारांवरील उपचार, आवश्यक औषधे, वैद्यकीय साहित्य आणि उपचारांशी संबंधित अन्य खर्चासाठी मदत देण्याची तरतूद या माध्यमातून करता येईल. दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि अन्य आपत्कालीन परिस्थितीत बाधित नागरिकांनाही या निधीतून मदत उपलब्ध करून देता येणार आहे.

वैद्यकीय मदतीपुरते या सोसायटीचे कार्य मर्यादित राहणार नसून, गरजेनुसार विविध सामाजिक उपक्रमांनाही निधी उपलब्ध करून देता येणार आहे.

गरीब नागरिकांना आवश्यक वस्तूंचे वितरण, दिव्यांगांसाठी कार्यरत संस्थांना सहाय्य आणि सामुदायिक आरोग्य शिबिरांचे आयोजन यांसारखे उपक्रम राबविता येतील. आरोग्यविषयक जनजागृती, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित कार्यक्रमांनाही या माध्यमातून मदत करता येणार आहे.

सांगली जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर, गोपीचंद पडळकरांनी विजयाचा गुलाल उधळला

सांगली : सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या मतमोजणीत जत सोसायटी गटातून आमदार गोपीचंद पडळकर यांनी विजय मिळवला आहे. मिरजेतील मार्केट यार्ड परिसरात जिल्हा बँकेच्या निवडणुकीची मतमोजणी सुरू होती. आठ टेबलवर २५ कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही प्रक्रिया पार पडली. बँकेच्या एकूण जागांपैकी १५ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरित सहा जागांसाठी १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

जत सोसायटी गटातील निवडणुकीत आमदार गोपीचंद पडळकर यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार विनोद पवार यांच्यावर मात केली. पडळकर यांना ५४ मते, तर विनोद पवार यांना ३४ मते मिळाली. अशा प्रकारे पडळकर यांनी २० मतांच्या फरकाने विजय मिळवला. पडळकर यांच्या विजयाची माहिती समोर येताच समर्थकांनी मतमोजणी केंद्राबाहेर जल्लोष सुरू केला. मिरज मिशन चौकात जेसीबीच्या माध्यमातून गुलालाची उधळण, डॉल्बीचा दणदणाट आणि क्रेनच्या साहाय्याने भव्य हार घालण्याची तयारी करण्यात आली आहे. . जिल्हा बँकम ध्ये गोपीचंद पडळकर यांची आता दणदणीत एन्ट्री झाली आहे. मोठ्या मताधिक्क्याने पडळकर निवडून आले.

गोपीचंद पडळकर विरुद्ध महाविकास आघाडीचे विनोद पवार यांच्यात लढत होती. अखेर पडळकरांनी या निवडणुकीत बाजी मारली. पडळकरांच्या विजयानंतर मतमोजणी केंद्रावर त्यांच्या समर्थकांचा जल्लोष बघायला मिळत आहे. गुलाल उधळून हा जल्लोष केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ही निवडणूक चर्चेत होती.

अतिवृष्टी, पूर व अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १२५ कोटींहून अधिक मदत

१ लाख ३५ हजार शेतकऱ्यांना मिळणार लाभ

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी : जिल्ह्यात मार्च,जून व जुलै २०२६ या कालावधीत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे शेतजमीन व पिकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांसाठी दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी तीन शासन निर्णय निर्गमित केले आहे. शासन निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यातील १ लाख ३५ हजार २४० शेतकऱ्यांच्या १ लाख ३५ हजार ८५४.२३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १२५ कोटी ४४ लाख ५८ हजार रुपयांची मदत जाहिर केली आहे.

मार्च २०२६ मध्ये जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या १ हजार ३०६ शेतकऱ्यांच्या ९२८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १ कोटी ५८ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

जून २०२६ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेत जमीनीच्या नुकसानीपोटी २८२ शेतकऱ्यांच्या ४८.६४ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ८ लाख ७६ हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे.

जुलै २०२६ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेत जमीनीच्या नुकसानीसाठी ६ हजार ४६५ बाधित शेतकऱ्यांच्या २ हजार ३८२.८७ हेक्टर क्षेत्रासाठी १० कोटी ७७ लाख ७० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. तसेच जुलै २०२६ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी १ लाख २७ हजार १८७ शेतकऱ्यांच्या १ लाख ३२ हजार ४९४.७२ हेक्टर बाधित क्षेत्राकरिता ११३ कोटी ३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

थेट लाभ हस्तांतरणाद्वारे मदत : शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेला निधी उपलब्ध तरतुदीतून वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. पात्र शेतकऱ्यांची माहिती विहित नमुन्यात संकलित करून संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्यात येईल. त्यानंतर उद्दह प्रणालीद्वारे मदतीची रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

मदतीची पुनरावृत्ती रोखणार : मदत वितरण करताना यापूर्वी त्याच हंगामात वितरित करण्यात आलेल्या मदतीची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. तसेच एकाच हंगामात एकाच नुकसानीसाठी विहित दरानेच मदत देण्यात यावी, लाभार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये आणि मदत वितरणाची प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करावी, असेही निर्देश आहेत.

शासनाच्या निकषांनुसार मदत वितरण : मंजूर निधी संबंधित नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठीच खर्च करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मदत वितरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी वितरित केलेल्या मदतीची बँकांकडून कर्जवसुलीसाठी वळती करण्यात येऊ नये, यासाठीही आवश्यक दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यास शासन प्राधान्य देत असून, पात्र बाधित शेतकऱ्यांपर्यंत मदतीचा लाभ वेळेत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिले.

विचारस्वातंत्र्याच्या नावाखाली जातीय संघर्षाला खतपाणी कशाला?

राजकारणात विचारांची लढाई व्हावी, धोरणांवर चर्चा व्हावी आणि सामाजिक प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली जावी, ही लोकशाहीची अपेक्षा आहे. मात्र, सामाजिक परिवर्तनाच्या नावाखालील वक्तव्यांमुळेच राजकीय आघाड्यांमध्ये मतभेद निर्माण होत असतील, तर त्या राजकारणाच्या दिशेचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. नेहा बोरा यांच्या 'ब्राह्मणवाद' या वक्तव्यावरून इंडिया आघाडीत निर्माण झालेली नाराजी याच वास्तवाकडे लक्ष वेधते. 'ब्राह्मणवाद' आणि 'ब्राह्मण समाज' या दोन वेगळ्या संकल्पना आहेत. एखाद्या विशिष्ट विचारप्रणालीवर टीका करणे आणि संपूर्ण समाजाला लक्ष्य करणे यात मूलभूत फरक आहे. हा फरक समजून न घेता केलेली विधाने सामाजिक सलोख्याला बाधा आणू शकतात. जातिव्यवस्था, सामाजिक विषमता आणि भेदभाव यांच्याविरोधातील लढा महत्त्वाचा असला, तरी त्यासाठी कोणत्याही समाजाविषयी द्वेष निर्माण होणे योग्य नाही. समाजवादी पक्षाचे खासदार राजीव राय यांनी कोणत्याही जाती, धर्म किंवा समुदायाबाबत सरसकट विधान करणे अयोग्य असल्याचे स्पष्ट केले. तर शिवसेना (ठाकरे) नेत्या प्रियांका चतुर्वेदी यांनीही या वक्तव्याला दुर्दैवी ठरवत डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही टोकाच्या विचारसरणी देशासाठी घातक असल्याचे म्हटले. विशेष म्हणजे, नेहा बोरा यांचा व्हिडीओ जुना असल्याची शक्यता व्यक्त झाली असली, तरी त्याची तारीख आणि वक्तव्याची नेमकी पार्श्वभूमी स्पष्ट झालेली नाही. या प्रतिक्रियांमधून इंडिया आघाडीतील वैचारिक मतभेद समोर आले आहेत. भाजपाला विरोध करण्याच्या समान भूमिकेवर एकत्र आलेल्या पक्षांमध्ये सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांवर मात्र एकमत नसल्याचे दिसते. राजकीय आघाडी टिकविण्यासाठी केवळ सत्ताधाऱ्यांना विरोध करणे पुरेसे नसते; तर स्वतःच्या व्यासपीठावरून व्यक्त होणाऱ्या विचारांबाबतही जबाबदारी स्वीकारावी लागते. जातीय विषमता आणि महिलांवरील अत्याचार यांविरोधात आवाज उठविणे आवश्यकच आहे. मात्र, गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्यासाठी जबाबदार धरण्याऐवजी संपूर्ण जात, धर्म किंवा समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे हा न्यायाचा मार्ग नाही. अन्यायाविरोधातील लढा हा अन्यायाचीच दुसरी आवृत्ती बनता कामा नये. लोकशाहीत अभिव्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व आहे; पण त्यासोबत सामाजिक जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. टीका विचारांवर असावी, व्यक्तीच्या गुन्ह्यावर असावी, व्यवस्थेतील दोषांवर असावी; जन्माधारित ओळखीवर नव्हे. अन्यथा सामाजिक न्यायाचा मूळ उद्देशच भरकटण्याची भीती आहे. इंडिया आघाडीसमोर आज खरा प्रश्न भाजपाला विरोध करण्याचा नसून स्वतःची वैचारिक भूमिका स्पष्ट करण्याचा आहे. जातीय सलोखा, महिला सुरक्षा, सामाजिक न्याय आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांबाबत आघाडीतील पक्षांची भूमिका एकसंध असणार की प्रत्येक पक्ष आपापल्या राजकीय सोयीनुसार भूमिका घेणार? हा प्रश्न आता जनतेसमोर उभा राहिला आहे. राजकारणासाठी सामाजिक संवेदनशीलतेचा बळी दिला जाऊ नये. कारण सत्ता बदलू शकते, आघाड्या बदलू शकतात; पण समाजात निर्माण झालेली जातीय दरी भरून काढणे सोपे नसते.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या गुन्हे नियंत्रणासाठी पोलीस दलाने सज्ज व्हावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

पुणे । प्रतिनिधी : आधुनिक तंत्रज्ञान, सामाजिक उपक्रम आणि वेगवान तपासाच्या माध्यमातून गुन्हे नियंत्रणात पिंपरी चिंचवड पोलीस दलाने चांगली कामगिरी केली आहे. येत्या काळात पिंपरी चिंचवडचा विस्तार पुण्यापेक्षा अधिक होणार असल्याने पोलीस दलाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावीपणे गुन्हे नियंत्रण करीत या आव्हानाला सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. युवाशक्तीला दिशा आणि शक्ती देण्यासाठी घर, परिसर, गाव, जिल्हा आणि महाराष्ट्र अंमली पदार्थमुक्त करावा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचा शुभारंभ व लोकार्पण आज करण्यात आले. त्यानिमित्ताने पिंपरी चिंचवड येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशात अंमली पदार्थाचे मोठे आव्हान आहे. युवा पिढीची क्षमता कमी करण्यासाठी आणि परिणामत: देशाची प्रगती रोखण्यासाठी देशात अंमली पदार्थ पाठविले जातात. याला पूर्णत: प्रतिबंध घालण्यासाठी पुढील ३ ते ४ वर्षात देश अंमली पदार्थमुक्त करण्याचा निर्धार शासनाने केला असून त्यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करायचे आहे. देशाच्या निर्मितीत महत्वाचे योगदान असलेल्या, नवोपक्रमात पुढे असलेल्या युवा पिढीला अंमली पदार्थापासून वाचविण्यासाठी प्रत्येकाला या अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत सहभाग घ्यावा लागेल.

राज्य शासन विविध पातळ्यांवर या दिशेने काम करीत आहे व्यसनाधीन व्यक्तींवर उपचार, लोकजागृती, अंमली पदार्थाच्या निर्मितीवर नियंत्रण आणणे, वितरण साखळी मोडीत काढणे अशा विविध जबाबदाऱ्या संबंधित यंत्रणांवर सोपविण्यात आल्या आहेत. पालकांनीदेखील व्यसनाधीन पाल्याचे समुपदेशन करण्यासोबत त्यावर योग्य उपचार वेळीच करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

पोलिसांना अत्याधुनिक सुविधा देण्यावर भर

मुख्यमंत्री म्हणाले, पिंपरी चिंचवडसाठी अत्यंत आधुनिक असे पोलीस मुख्यालय तयार करण्यात येत आहे. पोलीस आयुक्तालयाच्या नव्या इमारतीची रचना दिवंगत अजित पवार यांनी स्वत: लक्ष घालून तयार करून घेतली आहे. आयुक्तालयाची इमारत तयार झाल्यावर ते देशातील सर्वात आधुनिक पोलीस आयुक्तालय असेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

पोलीस मुख्यालयासाठी देखील ५० एकर जागा देण्यात आली आहे. पोलीस अधिकाऱ्यांसाठी आधुनिक स्वरुपाची निवासस्थाने उभारण्यात येत आहेत. पोलिसांसाठीच्या निवासस्थानाचा पारंपरिक आराखडा बदलून सर्व सोईयुक्त निवासस्थाने पोलिसांना देण्यात येत आहेत. पोलीस कुटुंबांना सन्मानाने जगता यावे यासाठी चांगल्या घरांची निर्मिती तयार करण्यात येत आहे, असे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुन्हेगारांवर वचक

शहर सुरक्षित ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान गरजेचे आहे. डायल ११२ मुळे प्रतिसादाची वेळ ३ मिनीटावर आली आहे आणि पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालय याबाबतीत राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. गुन्हे घडताना तात्काळ प्रतिसाद देऊन पोलीस कारवाई करताना दिसत आहेत. याची डिजीटल माहिती उपलब्ध होत आहे. गुन्हेगारांवर यामुळे वचक बसतांना दिसत आहे. रस्त्यावरील गुन्हे पूर्णत:नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहे. गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढते आहे. सीसीटीव्ही नेटवर्कच्या माध्यमातून वाहतूक, गुन्हे नियंत्रणाचे काम शक्य होत आहे. एआय तंत्रज्ञानाद्वारे मानवी मर्यादांवर मात करून गुन्ह्यांचा तपास करता येतो. एआय आधारित 'तपास सारथी'मुळे तपास सुरू झाल्यापासून न्यायालयात जाईपर्यंत ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे तपास व आरोपपत्र तयार करण्याचे काम होत आहे. यामुळे गुन्हे नियंत्रणात निश्चितपणे उपयोग होणार आहे.

पोलीस दलदेखील नवे तंत्रज्ञान आत्मसात करताना दिसत आहेत. बॉडीवॉर्न कॅमेऱ्यामुळे कमांड ॲण्ड कन्ट्रोल सिस्टीमलादेखील गुन्हे तपासाची माहिती मिळण्यासोबत पोलीसांना सुरक्षितता मिळणार आहे. वाहतूकीच्या तक्रारीदेखील यामुळे येत्या काळात कमी होतील. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाने अत्यंत कमी कालावधीत चांगली प्रगती केल्याचे कौतुकोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. पुढील १५ वर्षात पिंपरी चिंचवड परिसरात पुण्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणार असल्याने पोलीस दलाने त्यादृष्टीने सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी पोलिसांना चांगल्या सुविधा असणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवडसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या अत्याधुनिक सुविधा गुन्हे नियंत्रणासाठी तसेच वाहतूक नियमनासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास श्री.शिंदे यांनी व्यक्त केला. नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलिसांना हक्काची घरे व आवश्यक सुविधा देण्यासाठी शासनाचे विविध माध्यमातून प्रयत्न होत असून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

उद्याचे भविष्य असलेल्या तरुणाला अंमली पदार्थाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. पिंपरी चिंचवड पोलीस दलाने यासाठी सुरू केलेला उपक्रम स्तुत्य आहे. शहराची लोकसंख्या वाढत असताना शहराच्या सुरक्षिततेसाठी अनेक उपक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे. पोलिसांना हक्काचे घर आणि शहराला सुरक्षेचे कवच मिळवून देण्यासाठी पोलीस आयुक्तालयाचे उपक्रम महत्वाचे आहेत. पिंपरी चिंचवड हे राज्यातील पहिल्या क्रमांकाचे मुख्यालय व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पोलीस आणि त्यांच्या कुटुंबियांची काळजी घेण्यासाठी राज्य शासन समर्थपणे पोलिसांच्या पाठीशी उभे राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. पिंपरी चिंचवड पोलिसांनी दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांसाठी एक कोटीची मदत केली, ही पोलिसांची संवेदनशीलता आहे, अशा शब्दात त्यांनी पोलीस दलाचे कौतुक केले. राज्य शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी मजबूतीने उभे राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. पिंपरी चिंचवड शहराने काही वर्षातच आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पिंपरी चिंचवड शहराचा कायापालट करण्यात दिवंगत अजित पवार यांचे मोलाचे योगदान असल्याचेही त्यांनी सांगितले.

चारा टंचाई आणि उपाययोजना

चालु आर्थिक वर्षातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. चारा टंचाई, उपाययोजना आणि चारा उत्पादन या विषयीची ही माहिती

महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हे प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहेत. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पुर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंदाच्या खरीप हंगामापासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे. त्यातही चाऱ्याअभावी पशुधन वाचविणे ही एक मोठी समस्या समोर उभी राहणार आहे.

महाराष्ट्र राज्यात २०२६ च्या नैऋत्य मोसमी पावसामध्ये झालेली तूट, पावसाचे असमान वितरण, खरीप पिकांच्या उत्पादनात झालेली घट तसेच यावर्षीच्या रब्बी हंगामामधील संभाव्य कमी पेरणी क्षेत्र यामुळे पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच आगामी काळात पशुधनासाठी हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या संभाव्य चारा टंचाईवर वेळीच मात करण्यासाठी कृषी विभागामार्फत राज्यभरात चारा उत्पादनावर भर देण्यात येणार आहे.

राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमितीस चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता ६ ऑक्टोबर २०२६च्या शासन निर्णयान्वये गठीत अभ्यासगटाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये चारा उत्पादन वाढविणे, कमी पाण्यात येणाऱ्या व बहुकापणी चारा पिकांना प्रोत्साहन देणे, चारा बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे, शासकीय जमिनीवर चारा लागवड करणे, चारा उत्पादनाबाबत प्रात्यक्षिके आयोजित करणे आणि उपलब्ध यंत्रसामग्रीचा वापर करणे इत्यादी उपाययोजनांची शिफारस करण्यात आली आहे. या शिफारशींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय यंत्रणा, कृषी विद्यापीठ, तालुका बीज गुणन केंद्र व संबंधित संस्थांनी समन्वयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०२० मध्ये चारा टंचाईच्या काळात कृषी विभागाने करावयाची कार्यवाही नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने अभ्यासगटाच्या कृषी विभागाशी संबंधित शिफारशींची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता कृषी विभागामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची गरज ओळखून त्यादृष्टीने शासनाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत.

दुष्काळजन्य परिस्थितीत चारा टंचाईवर उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत अभ्यासगटाच्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या अहवालातील कृषी विभागाशी संबंधित शिफारशी विचारात घेऊन, राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी कृषी विभागामार्फत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

चारा बियाण्यांची उपलब्धता व नियोजन

रब्बी हंगाम २०२६ मध्ये चारा बियाण्याची कमतरता भासू नये याकरीता आयुक्त (कृषी) यांनी चारा पिकांच्या लागवडीसाठी आवश्यक असलेल्या बियाण्यांची जिल्हानहाय व पिकनिहाय मागणी पशुसंवर्धन विभागातील संबंधित अधिकारी यांच्या समन्वयाने निश्चित करावी. त्यानुसार महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, एच.आय.एल., कृभको, एन.एफ.एल., आय.एफ.एफ. डी.सी., आय.सी.ए.आर., के.व्ही.के. इत्यादी यांच्या समन्वयाने बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तथापि, यासंदर्भातील केंद्र शासनाच्या सर्वसाधारण व विशिष्ट मार्गदर्शक सूचनांचे तसेच आवश्यक त्या नोंदणी, परवाना इत्यादींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीत उत्पादन देणारी व एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणारी चारा पिके घेण्यास प्राधान्य देण्यात यावे. यासाठी स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार, सिंचनाची उपलब्धता व पीक कालावधी विचारात घेऊन योग्य चारा पिकांची शिफारस पशुसंवर्धन विभागाच्या संबंधित जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या समन्वयाने शेतकऱ्यांना करण्यात यावी.

चारा साक्षरता अभियान व प्रोत्साहन

स्थानिक परिस्थितीनुसार मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, शुगरग्रेझ व इतर योग्य चारा पिकांच्या लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे. सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे अशा क्षेत्रांमध्ये रब्बी हंगामात चारा पिकांची लागवड वाढविण्यासाठी आवश्यक बियाणे, खतांचा संतुलित वापर, पाणी व्यवस्थापन, पेरणीची योग्य वेळ, कापणी व पुनर्वाढ साठवणूक व अपव्यय कमी करणे इत्यादी बाबत कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणांनी पशुसंवर्धन विभाग, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांच्या समन्वयाने मार्गदर्शन करावे.

चारा पिकांची लागवड, उत्पादन खर्च, अपेक्षित उत्पादन, कापणीचे नियोजन, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि चाऱ्याचे संवर्धन व मूल्यवर्धन याबाबत शेतकरी प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत. चारापिकांचे लागवड तंत्र, खत व्यवस्थापन व अल्प कालावधीचे गवत व हंगामी चारापिके इत्यादी चारा लागवडीच्या तांत्रिक बाबींबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी कृषी विभागाच्या नियमित विस्तार कार्यक्रमांचा प्रभावी वापर करावा.

कृषी विभागाच्या जमिनीवर चारा

कृषी विभागाच्या अधिपत्याखालील कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे व महाबीज इत्यादी कडील जमिनींचा आढावा घेऊन, जेथे शक्य आहे व आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत अशा क्षेत्रांवर मका, न्यूट्रीफीड, शुगरग्रेज, ज्वारी, बाजरी यासारख्या चारा पिकांची रब्बी हंगामात प्राधान्याने लागवड करण्यात यावी. हायड्रोफोनिक, अझोला व बिनकाटेरी निवडून लागवड यासारख्या पर्यायी स्रोताद्वारे चारा उत्पादन करण्याच्या पद्धतींचा कृषी विद्यापीठाद्वारे मोहिम स्वरुपात कार्यक्रम राबविण्यात यावा. संबंधित संस्थांनी उपलब्ध जमीन, सिंचन सुविधा, लागवडीसाठी आवश्यक निविष्टा व अपेक्षित उत्पादन यांचा विचार करून चारा लागवडीचा नियोजन आराखडा तयार करावा.

कृषी विद्यापीठे व बीज गुणन केंद्रांच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिक चारा लागवड प्लॉट विकसित करण्यात यावेत. या प्रक्षेत्रांचा उपयोग शेतकरी प्रशिक्षण, चारा पिकांचे प्रात्यक्षिक व तंत्रज्ञान प्रसारासाठी करण्यात यावा. ही कार्यवाही करताना संबंधित जमिनींचा मूळ उद्देश,अंमलात असलेली प्रचलित कार्यपद्धती यांचा अवलंब करावा.

चारा कापणीसाठी यंत्रसामग्री

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील कस्टम हायरींग सेंटर, कृषी औजारे बँक यांची व त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीची माहिती शेतकऱ्यांना तसेच पशुसंवर्धन विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावी. पशुसंवर्धन विभागाच्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ही माहिती व त्यांच्याकडील माहिती विचारात घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

जिल्ह्यातील उपलब्ध चाऱ्याचे/ चारापिके लागवडीखालील क्षेत्राचे मॅपिंग व सूक्ष्म नियोजन करण्यासाठी चारापिकांखालील क्षेत्र, पीकनिहाय पेरणी क्षेत्र व अपेक्षित उत्पादन (पीक अवशेषांसह) याबाबतची माहिती तसेच चारा उत्पादक शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्था/कंपन्या (ऋझज/ ऋझउ) यांचे नेटवर्क तयार करण्यासाठी आवश्यक माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी संबंधित यंत्रणांच्या मागणीनुसार वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावी.

चारा उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे. आयुक्त (कृषी) यांनी आवश्यकतेनुसार त्यांच्या स्तरावर स्वतंत्रपणे सूचना निर्गमित कराव्यात.

आयुक्त (कृषी), विभागीय कृषी सहसंचालक व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी वरील बाबींच्या अनुषंगाने नियमितपणे आढावा घ्यावा. शासन परिपत्रकातील कृषी विभागाच्या संबंधित बाबींच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्याकरीता कृषी आयुक्त स्तरावर संचालक, विस्तार व प्रशिक्षण, विभाग स्तरावर संबंधित विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा स्तरावर संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका स्तरावर संबंधित तालुका कृषी अधिकारी हे नोडल अधिकारी राहतील. असेही शासनाने सुचित केले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांनी या शिफारशी/ सूचनांच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच उपाययोजना व अंमलबजावणी करण्याकरीता कृषी विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठे व सर्व संबंधितांना स्वतंत्रपणे सूचना निर्गमित कराव्यात व क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय ठेवून कार्यवाही करण्याबाबत निर्देशही देण्यात आले आहेत.

शेतकरी हा महाराष्ट्राचा अन्नदाता आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान करणे, त्याच्या संकटात त्याच्या पाठीशी उभे राहणे आणि त्याला पुन्हा उभारी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. संकट कितीही मोठे असो, महाराष्ट्राचा शेतकरी एकटा नाही. त्याचे सोबती पशुधनही तितकेच महत्वाचे आहे. राज्य शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

अनिल आलुरकर
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

महत्त्वाचे...

सीईटी परीक्षेत दोन हजार ३०० कोटींचा घोटाळा? रोहित पवारांचा स्टिंग ऑपरेशनद्वारे पर्दाफाश

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : राज्यातील अभियांत्रिकी प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या सीईटी परीक्षेत मोठा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी केला आहे. सीईटी परीक्षेचा डेटा लीक करून प्रवेश प्रक्रियेत गैरव्यवहार केला जात असून या प्रकरणात तब्बल २ हजार ३०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. या प्रकरणात मुख्यमंत्री कारवाई करावी, अशी मागणी केली. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी स्टिंग ऑपरेशनचा व्हिडिओ सादर केला.

'एड्युस्पार्क' कंपनीवर संशय – सीईटी परीक्षेचा डेटा 'एड्युस्पार्क' कंपनीकडून लीक झाल्याचा संशय रोहित पवार यांनी व्यक्त केला. या कंपनीला सुमारे २ हजार ३०० कोटी रुपयांची कामे देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. तत्कालीन मंत्री उदय सामंत यांच्या कार्यकाळात कंपनीला काम मिळाले. त्यानंतर चंद्रकांत पाटील आणि दीपक केसरकर यांच्या काळातही कंपनीला कंत्राटे देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन करूनही ठोस कारवाई झालेली नसल्याचे पवार म्हणाले.

अभियांत्रिकी प्रवेशासाठी २५ लाखांचा दर – पत्रकार परिषदेत शिक्षक नारायण शिंगारे यांनी स्टिंग ऑपरेशनचा व्हिडिओ दाखवला. अभियांत्रिकीच्या नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी २५ लाख रुपये मागितले जात असल्याचा दावा त्यांनी केला. हा प्रकार लखनौमधून चालवला जात असून, सुभेंदू प्रभात नावाच्या व्यक्तीच्या सात कंपन्या असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित व्यक्तीने एका कॅबिनेट मंत्र्याचा भाऊ असल्याचे सांगून विद्यार्थ्यांची दिशाभूल केल्याचाही आरोप त्यांनी केला.

पोलीस, एसआयटीकडून तक्रार घेतली नसल्याचा आरोप – या प्रकरणी स्थानिक पोलीस आणि एसआयटीकडे तक्रार देण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांनी तक्रार स्वीकारली नाही, असा दावा शिंगारे यांनी केला. राज्यातील उच्च शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार सुरू असून विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. या प्रकरणी सरकारने तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही केली.

तुकाराम मुंढेंची धडक कारवाई; पतंजलीचे तूप जप्त, शेअर्सवर काय परिणाम?

दैनिक आपला विदर्भ

मुंबई : तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अन्नभेसळीविरुद्ध मोठी मोहीम उघडली असून, राज्यभरातील ११४ आस्थापनांमधून ९ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा साठा जप्त केला आहे.

या कारवाईदरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथे संशयास्पद चुकीचे लेबलिंग आणि भेसळीच्या संशयावरून पतंजलीच्या २२७९ लिटर गाईच्या तुपाचा साठा जप्त करण्यात आला, ज्याची किंमत २०.२० लाख रुपये इतकी आहे.

जप्त केलेल्या साठ्यामध्ये खाद्यतेल, मसाले, तांदूळ, कडधान्ये, गूळ, गव्हाचे पीठ, बेसन, मैदा, तूप, दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, नमकीन, सुका मेवा, आंब्याचा गर, चारोळी, चिया सीड्स, बेकरी उत्पादने आणि हक्का नूडल्स यांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील सुंदरवाडी येथे पतंजली आयुर्वेदचे सुपर डिस्ट्रिब्युटर असलेल्या 'मेसर्स दिव्य महावितरक' या ठिकाणाहून पतंजली गाईचे तूप मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आले.

एफडीएने दोन बॅचेसमधील एकूण ४०३२ युनिट्स (२२७९ लिटर) तूप जप्त केले. या साठ्याचे मूल्य २० लाख रुपये इतके आहे. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ च्या विविध कलमांच्या अंतर्गत, हे उत्पादन चुकीच्या पद्धतीने लेबल केलेले किंवा भेसळयुक्त असल्याच्या संशयावरून जप्त करण्यात आले असल्याचे विभागाने सांगितले. एफडीएच्या म्हणण्यानुसार, प्राथमिक तपासणीत ही उत्पादने कायद्याचे उल्लंघन करणारी असल्याचे दिसून आले आहे.

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या या कारवाईनंतर पतंजली फूड्स लिमिटेडच्या शेअरवर याचा काय परिणाम होणार, याबाबत गुंतवणूकदारांमध्ये चर्चा होता. मात्र, या कावाईचा पतंजली फूड्स लिमिटेडच्या शेअर्सवर कोणताही नकारात्मक परिणाम झाला नसल्याचे पाहायला मिळत आहे.

सकाळी बाजार उघडला तेव्हा पतंजलीच्या शेअर्सचा ३७० रुपयांवर व्यवहार सुरू झाला. आतापर्यंतच्या व्यवहारात या शेअरने ३७५ रुपये ही दिवसातील उच्चांकी तर ३६८ रुपये ही नीचांकी पातळी गाठली आहे.

वर्षभरात ३५ टक्क्यांचा तोटा

या शेअरच्या गेल्या ५२ आठवड्यांच्या काम गिरीवर नजर टाकल्यास, या शेअरची नीचांकी किंमत ३२८.२० रुपये आणि उच्चांकी किंमत ५९४.९५ रुपये इतकी नोंदवली गेली आहे. वार्षिक कामगिरीच्या दृष्टीने पाहता, पतंजली फूड्स लिमिटेडच्या शेअरच्या किमतीत ३५.६३ टक्क्यांची घट झाली आहे.

पतंजली फूड्स लिमिटेडचे बाजार भांडवल ६६,६२१.४१ कोटी रुपये असून, कंपनीचे इ/ए गुणोत्तर ११.६६ इतके आहे.

नेहा बोरा यांच्या 'ब्राह्मणवाद' वक्तव्यावरून 'इंडिया' आघाडीत वाद; सपा अन् ठाकरे गटाचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थी नेत्या आणि 'आयसा'च्या अध्यक्षा नेहा बोरा यांनी 'ब्राह्मणवादा'बाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून 'इंडिया' आघाडीत तीव्र मतभेद समोर आले आहेत. काँग्रेसचा प्रमुख मित्रपक्ष असलेल्या समाजवादी पक्षाने बोरा यांच्या या वक्तव्यापासून स्पष्ट शब्दांत फारकत घेतली असून, शिवसेना (ठाकरे) पक्षानेही यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

निवडणूक आयोगाच्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेतील कथित गैरव्यवहारांवरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात विरोधकांच्या व्यासपीठावरून आक्रमक भूमिका मांडल्यामुळे नेहा बोरा नुकत्याच चर्चेत आल्या होत्या. मात्र ''ब्राह्मणवादापासून मुक्ती हवी,'' या त्यांच्या जुन्या वक्तव्याचा व्हिडीओ समोर आल्यानंतर राजकीय वाद पेटला आहे.

समाजवादी पक्षाची भूमिका काय?

उत्तर प्रदेशातील घोसी लोकसभा मतदारसंघाचे खासदार आणि समाजवादी पक्षाचे नेते राजीव राय यांनी बोरा यांच्या विधानावर आक्षेप घेतला. ''अशा प्रकारे सरसकट विधान करणे पूर्णपणे अयोग्य आहे. प्रत्येक धर्मात आणि समाजात चांगली तसेच वाईट माणसे असतात. आपण कोणत्याही घटकाबद्दल असा सामान्य निष्कर्ष काढू नये,'' असे राय म्हणाले.

तसेच ''अशा विधानांमुळे राजकीय वातावरण तापवणे हेच भाजपाला हवे आहे, त्यामुळे आपण त्यांच्या सापळ्यात का अडकावे? आजच्या काळात अशा भाषेचा आधार नसलेले राजकीय वक्तृत्व अजिबात स्वीकारार्ह नाही. जात, धर्म, समुदाय किंवा प्रांतावरून सरसकट विधाने करणे टाळायला हवे,'' अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

ठाकरे गटाचीही टीका

केवळ अखिलेश यादव यांच्या पक्षानेच नव्हे, तर शिवसेना (ठाकरे) नेत्या प्रियांका चतुर्वेदी यांनीही नेहा बोरा यांच्या भूमिकेला दुर्दैवी ठरवले आहे. ''उजवी असो वा डावी, कोणत्याही प्रकारची टोकाची आणि अतिरेकी विचारसरणी देशासाठी हानिकारक असते,'' असा टोला त्यांनी लगावला.

चतुर्वेदी म्हणाल्या, ''हा व्हिडीओ जुना असू शकतो. परंतु मंदिरांमध्ये बलात्कार होतात, पुजारी असे गुन्हे करतात किंवा ब्राह्मण महिला सुरक्षित नाहीत, अशा प्रकारची मांडणी करणारी मानसिकता समोर आणणारा हा विचार अतिशय दुर्दैवी आहे. मी सहसा जातीच्या मुद्द्यांवर बोलणे टाळते; मात्र एक ब्राह्मण महिला म्हणून विचारते की, अशी हीन भाषा वापरणे योग्य आहे का? मी नेहा बोरा यांच्याशी बसून चर्चा करेन आणि त्यांना सांगेन की, प्रत्येक गोष्टीकडे जात किंवा धर्माच्या चष्म्यातून पाहिले जाऊ नये. त्या तरुण, हुशार आणि लढाऊ वृत्तीच्या आहेत; त्यांनी आपल्या बुद्धीचा वापर विधायक कामांसाठी करायला हवा.

भाजपाकडून 'हिंदूद्वेष्टेपणाचा' आरोप

दरम्यान, या व्हिडीओवरून भाजपाने थेट काँग्रेस आणि राहुल गांधींना लक्ष्य केले आहे. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी हा व्हिडीओ 'एक्स'वर शेअर करत

नेहा बोरा यांच्यावर हिंदूद्वेष पसरवल्याचा आरोप केला. भंडारी यांनी बोरा यांना राहुल गांधींच्या राजकारणाची 'पोस्टर गर्ल' संबोधत, हे वक्तव्य राहुल गांधींच्या आधीच्या एका वक्तव्याशी जोडले.

''काँग्रेसला मतांच्या राजकारणासाठी हिंदूंचा द्वेष आहे आणि ही विचारसरणी देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण करणारी आहे,'' अशी टीका त्यांनी केली.

हा व्हिडीओ कधीचा आहे आणि नेहा बोरा यांनी नेमक्या कोणत्या पार्श्वभूमीवर हे वक्तव्य केले होते, याची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. मात्र, निवडणूक आयोगाविरोधात काँग्रेस आणि 'इंडिया' आघाडीच्या व्यासपीठावर राहुल गांधींसोबत आंदोलनात सक्रिय असणाऱ्या नेहा बोरा यांच्या या वक्तव्यामुळे विरोधकांची कोंडी झाली असून, आघाडीतील मित्रपक्षांनी वेळीच सावध पवित्रा घेत स्वत:ला या विधानापासून दूर केले आहे.

अमित शाह तुम्ही लोकशाही वाचवण्यासाठी मोर्चे काढताय आणि तुमच्याच सहकार मंत्रालयात, नियम कायदे धाब्यावर बसवून लोकशाहीची हत्या सुरुय, गोकुळला काय सुरुय? राऊतांचा सडकून प्रहार

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : गोकुळच्या चेअरमन निवडीवरून महायुतीकडून जो मागच्या दाराने सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न सुरू आहे, त्या विरोधात महाराष्ट्रामध्ये संतापाचा उद्रेक झाला आहे. गोकुळच्या निवडणुकीमध्ये बहुमत मिळालेल्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे नेते आमदार सतेज पाटील यांनी आज महाराष्ट्रातील संपादक, पत्रकारांना पत्र लिहीत गोकुळमध्ये जो मागच्या दाराने महायुतीकडून गोकुळच्या जनादेशाला नाकारून कब्जा करण्याचा प्रयत्न सुरू आहे, त्या विरोधामध्ये आवाज उठवण्याची विनंती केली आहे. गोकुळच्या माध्यमातून सहकारच्या गाभ्यावरच घाला घातला जात असल्याचं सतेज पाटील यांनी म्हटलं आहे.

नियम आणि कायद्यांच्या चिंधड्या उडवत लोकशाहीची हत्या

या सर्व पार्श्वभूमीवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यावर हल्लाबोल केला आहे. त्यांनी म्हटलं आहे की, अमित शाह तुम्ही लोकशाही वाचवण्यासाठी पदयात्रा करत आहात. मात्र महाराष्ट्रामध्ये आपल्या सहकार मंत्रालयातील नियम आणि कायद्यांच्या चिंधड्या उडवत लोकशाहीची हत्या होत आहे. बहुमताचा अनादर करणं ही लोकशाहीची हत्याच आहे. गोकुळ संघात, दूध संघात काय सुरू आहे? अशी विचारणा संजय राऊत यांनी आपल्या पोस्टमधून केली आहे. पोस्टमध्ये राऊत यांनी अमित शाह आणि पीएमओला सुद्धा टॅग केलं आहे. सोबत सतेज पाटील यांनी महाराष्ट्रातील सर्व संपादकांना पत्र लिहिलेल्या पत्राची प्रत सुद्धा सोबत जोडली आहे. दुसरीकडे सतेज पाटील यांनी सुद्धा शासन नियुक्त संचालकांना मतदानाच्या अधिकारावरून हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले की, जर मतदानाचा अधिकार देत संख्याबळ फिरवणार असतील तर मग निवडणुका घ्यायच्या कशाला, लोकांच्या मताचा नेमका अर्थ काय? अशा शब्दात सतेज पाटील यांनी विचारणा केली आहे.

आदिवासी बांधवांना आधार कार्ड व जन्म दाखले मिळण्यासाठी १६ जिल्ह्यांत विशेष मोहीम राबवा – मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई । प्रतिनिधी : आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेले आधार कार्ड आणि जन्म दाखले उपलब्ध करून देण्याकरिता राज्यातील सर्व आदिवासी जिल्ह्यांमध्ये विशेष मोहीम राबविण्यात यावी. राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांना स्वतंत्र आधार नोंदणी संच उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आदिवासी संघटनांनी पुढाकार घेऊन आदिवासी बांधवांमध्ये जनजागृती करावी, जनसभा आयोजित कराव्यात आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी, असे आवाहनही मंत्री बावनकुळे यांनी यावेळी केले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी, कष्टकरी, महिला, बालके व कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीस वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित, डहाणूचे आमदार कॉम्रेड विनोद निकोले, माजी आमदार विवेक पंडित, कॉम्रेड जे. पी. गावीत, पुनर्वसन विभागाचे सहसचिव संजय इंगळे, किसान सभेचे कार्याध्यक्ष रडका कलांगडा, कोषाध्यक्ष सदाशिव साबळे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पालघर जिल्हा सचिव किरण गहला, महसूल विभागाचे अवर मुख्य सचिव विकास खारगे, ठाणे, पालघर व अहिल्यानगर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित अधिकारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळविताना कागदपत्रांच्या अभावामुळे अडचणी येऊ नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष पुढाकार घ्यावा. जन्म नोंदणीपासून आधार नोंदणीपर्यंतची प्रक्रिया सुलभ करून पात्र नागरिकांना या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने विशेष शिबिरे आयोजित करावीत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

वनहक्क दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी विशेष मोहीम

प्रलंबित वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी विशेष कालबद्ध मोहीम राबविण्यात यावी. सक्षम समित्यांनी प्रलंबित दाव्यांवर कारणासहित निर्णय घ्यावेत. ग्रामसभेचे अभिलेख, प्रत्यक्ष वहिवाटीचे पुरावे आणि कायद्यानुसार ग्राह्य धरता येणाऱ्या पुराव्यांचा विचार करावा. उपग्रह प्रतिमा व संबंधित तांत्रिक माहितीचाही पूरक साधन म्हणून वापर करावा, असे निर्देश महसूल मंत्र्यांनी दिले. पात्र वनहक्क दाव्यांच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेल्या पुराव्यांबाबत संबंधित यंत्रणांनी संवेदनशीलतेने कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

नामंजूर वनहक्क दाव्यांचे पुनर्विलोकन

मंत्री बावनकुळे म्हणाले, पूर्वी नामंजूर करण्यात आलेल्या वनहक्क दाव्यांचे सक्षम प्राधिकरणामार्फत कायद्यानुसार पुनर्विलोकन करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी. ज्या दावेदारांना ग्रामसभेकडून वनहक्क पट्टे मिळालेले नाहीत, अपूर्ण पट्टे मिळाले आहेत किंवा अकारण दावे नामंजूर करण्यात आले आहेत, अशा प्रकरणांची तपासणी करून पात्र लाभार्थ्यांना न्याय देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. दावेदारांना नामंजुरीची कारणे समजावून सांगावीत आणि अतिरिक्त पुरावे सादर करण्याची संधी द्यावी. शेतकऱ्यांकडून दंड पावत्या किंवा अन्य विशिष्ट पुरावे मागण्याच्या प्रक्रियेत आवश्यक सुधारणा करावी. याबाबत तातडीने सुधारणा करणारा शासन आदेश जारी करण्याचे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले.

नोंद नसलेल्या व बेदखल कुळांच्या प्रश्नांवर कार्यवाही

डहाणू व तलासरी तालुक्यांसह संबंधित क्षेत्रांतील अभिलेखांमध्ये नोंद नसलेल्या आणि बेदखल झालेल्या कुळांच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी दिले. यासंदर्भात पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी तांत्रिक अडचणी बैठकीत मांडल्या असता, जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने प्राधान्याने प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केले.

वेठबिगारीतून मुक्त व्यक्ती व कुटुंबांचे पुनर्वसन

ठाणे, पालघर, नाशिक, पुणे, रायगड आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील वेठबिगारीतून मुक्त झालेल्या व्यक्ती व त्यांच्या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी प्रलंबित प्रकरणे मार्गी लावावीत. मुक्त व्यक्तींचे दाखले, तातडीचे सहाय्य, आर्थिक पुनर्वसन, निवास, आरोग्य, मुलांचे शिक्षण आणि उपजीविकेच्या संधी यांचा समावेश असलेला पुनर्वसन आराखडा तयार करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश महसूल मंत्र्यांनी यावेळी दिले.

पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील किन्ही नाईक गावासाठी टँकर मंजूर

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी : पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील किन्ही नाईक गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

किन्ही नाईक येथे ७०० पशुधन व २७१० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ६५ हजार २०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाला गती ; देऊळगाव राजा व सिंदखेडराजा येथे तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी : ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, गावपातळीवर आरोग्यविषयक जनजागृती वाढविणे तसेच ग्रामपंचायत आणि आरोग्य विभागाच्या समन्वयातून गावांचे आरोग्य अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत देऊळगाव राजा व सिंदखेडराजा येथे तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आले. यावेळी अभियानाची उद्दिष्टे, नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजित मंडाले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र साळवे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कार्यशाळेत माता व बाल आरोग्य, नियमित लसीकरण, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध व नियंत्रण, क्षयरोग व कुष्ठरोग निर्मूलन, किशोरवयीन आरोग्य, पोषण, स्वच्छता, आरोग्य तपासणी तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे, लोकसहभागातून आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करणे आणि ग्रामपंचायत व आरोग्य विभागातील समन्वय अधिक मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला. अभियानांतर्गत आतापर्यंत झालेल्या कामकाजाचा आढावा घेऊन आगामी काळातील उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली.

या कार्यशाळेला सिंदखेडराजा तालुक्यातील गटविकास अधिकारी अजित बांगर, बालविकास प्रकल्प अधिकारी जीवन राठोड, गटशिक्षणाधिकारी स्वप्नील निकम, विस्तार अधिकारी पंचायत भास्कर धुगे, आरोग्य विस्तार अधिकारी राधा आटोळे यांच्यासह देऊळगाव राजा तालुक्यातील संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध गावांचे सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

प्रत्येक गाव आरोग्यदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ग्रामपंचायत व आरोग्य विभागाने परस्पर समन्वय राखून जबाबदारीने काम करणे आवश्यक असून, लोकप्रतिनिधी, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून निरोगी व सुदृढ समाजनिर्मिती करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत आणि आरोग्य विभागाचा समन्वय, लोकसहभाग व नियमित आढावा या बाबींना विशेष महत्त्व असल्याचे या कार्यशाळेत अधोरेखित करण्यात आले.

प्रत्येक घरात आरोग्याचे दैवत धन्वंतरीची पूजा करा ; धनत्रयोदशीला निरोगी जीवनाचा संकल्प करा -केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा : मानवी जीवनात आरोग्याला अनन्यसाधारण महत्त्व असून, उत्तम आरोग्य हीच सुखी आणि समृद्ध जीवनाची खरी संपत्ती आहे. त्यामुळे धनत्रयोदशीच्या पवित्र पर्वावर आरोग्याचे दैवत भगवान धन्वंतरी यांची प्रत्येक घरात श्रद्धापूर्वक पूजा करावी आणि निरोगी जीवनाचा संकल्प करावा, असे आवाहन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

भारतीय संस्कृती आणि परंपरेत आरोग्याला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. दीपावली पर्वाची सुरुवात धनत्रयोदशीने होते. या दिवसाचे भगवान धन्वंतरी यांच्या पूजनाशी असलेले महत्त्व आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणारे आहे. धन्वंतरी देवतेची उपासना ही केवळ धार्मिक परंपरा नसून निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याची प्रेरणा देणारी आहे.

प्रत्येक कुटुंबाने धनत्रयोदशीच्या दिवशी भगवान धन्वंतरी यांचे पूजन करून आरोग्य संवर्धनाचा संकल्प करावा. दैनंदिन जीवनात योग, व्यायाम आणि आरोग्यदायी आहाराचा समावेश करावा. नियमित योगाभ्यास आणि योग्य जीवनशैलीच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्यास प्राधान्य द्यावे, असेही केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले.

धनत्रयोदशीच्या निमित्ताने नागरिकांनी आरोग्याबाबत सजग राहून स्वतःच्या तसेच कुटुंबाच्या निरोगी जीवनासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

दात घासता घासताना टूथब्रशच गिळला; अथक प्रयत्नानंतर शस्त्रक्रियेविनाच डॉक्टरांनी पोटातून काढला बाहेर

दैनिक आपला विदर्भ

नवी मुंबई : पेणमधील एका ५० वर्षीय रिक्षाचालकाने दात घासता घासता टूथब्रशच गिळल्याची घटना घडली आहे. यानंतर त्यांना नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दरम्यान, ३० मिनिटांच्या आव्हानात्मक एंडोस्कोपी प्रक्रियेद्वारे टूथब्रश बाहेर काढण्यात डॉक्टरांना यश आलं आहे. शस्त्रक्रियेविना डॉक्टरांनी पोटातून टूथब्रश बाहेर काढला आहे.

नेमकी कशी घडली घटना?

दात घासताना चुकून टूथब्रश गिळल्याने ५० वर्षीय व्यक्तीला रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली होती. तपासणीत संपूर्ण टूथब्रश पोटात अडकल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी एंडोस्कोपीद्वारे कोणतीही शस्त्रक्रिया न करता तो बाहेर काढला. या उपचारानंतर काही तासांतच रुग्णाला घरी सोडण्यात आले. पेण येथील राहणारे आणि शारीरीकरित्या विकलांग रिक्षाचालक राजेंद्र माळुसरे हे नेहमीप्रमाणे सकाळी दात घासत असताना चुकून त्यांच्या तोंडातून टूथब्रश पोटात गेला. यानंतर त्यांनी सुरुवातीला स्थानिक डॉक्टरांकडे धाव घेतली. डॉक्टरांनी एक्स-रे काढण्याचा सल्ला दिला; मात्र त्यामध्ये तो दिसून आला नाही. त्यामुळे पुढील तपासणीसाठी त्यांना नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले. एन्डोस्कोपी केल्यानंतर संपूर्ण टूथब्रश त्यांच्या पोटात अडकल्याचे दिसून आले. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, हेपॅटोलॉजिस्ट आणि थेरप्युटिक एन्डोस्कोपिस्ट डॉ. रावसाहेब राठोड यांच्या नेतृत्वाखालील टिम ने ही आव्हानात्मक प्रक्रिया यशस्वी पार पाडली आहे.

कारखानदारांनो आजच निर्णय घ्या, नाहीतर उद्यापासून तुमचे वाईट दिवस चालू होतील, दिवाळी साजरी करुन देणार नाही, राजू शेट्टींचा इशारा

मुंबई : किसान खडा तो सबसे बडा, लढणाऱ्या माणसाच्या पाठीशी हा महाराष्ट्र उभा राहतो. कारखानदारांनो आजच निर्णय घ्या नाहीतर उद्या सकाळपासून तुमचे वाईट दिवस चालू होतील असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे. केसेस दाखल झाल्या तर राज्यातील वकिलांची फौज पैसे न घेता लढायला तयार आहे. आमच्या आयुष्यात कायम शिमगा आहे, पण कारखानदारांनो तुमची दिवाळी होऊ देणार नाही अशा इशारा देखील शेट्टींनी दिला. ऊसाला चार हजार पाचशे रुपये दर मिळावा या मागणीसाठी पुणे बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन सुरु आहे.

शेतकऱ्यांच्या आंदोलनाला अपशकून करु नका असेही शेट्टी म्हणाले. हे काय माझं एकट्याच आंदोलन नाही. ऊसाचं एक कांड देखील शेताबाहेर जाता कामा नये. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील शेतकरी ४५ वर्षांनी एकत्र येऊन आंदोलन करत आहेत. लढाई अंतिम टप्यात आली आहे असेही राजू शेट्टी म्हणाले. उसाच्या दराचा तोडगा काढला नाहीतर शहरात जाणारा भाजीपाला आम्ही रोखणार असल्याचा इशारा शेट्टींनी दिला. शेतकऱ्यांची दिवाळी झाली नाही तर तुमची दिवाळी देखील होऊ देणार नाही असे म्हणत राजू शेट्टी यांचा सरकारला आणि कारखानदारांना इशारा दिला आहे. दरम्यान, राजू शेट्टींच्या आंदोलनानंतर वातावरण चांगलच गरम झाल्याचं पाहायला मिळत आहे.

पेनटाकळी धरणावर आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकऱ्यांचा धडक मोर्चा; पाणी सोडण्याच्या मागणीने परिसर दणाणला!

'शेतकऱ्यांना पाणी द्या, तुम्ही सोडा नाहीतर आम्ही सोडतो!' शिवसेनेचा आक्रमक पवित्रा; पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन

दैनिक आपला विदर्भ

मेहकर । प्रतिनिधी : पेनटाकळी धरणातील शिल्लक पाणीसाठा तातडीने सिंचनासाठी खुला करण्यात यावा, या मागणीसाठी आज, मंगळवार दि. ३ नोव्हेंबर रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी आणि शिवसैनिकांनी पेनटाकळी धरणावर धडक मोर्चा काढला.

'शेतकऱ्यांना पाण्याचा मार्ग मोकळा करा, तुम्ही पाणी सोडा, अन्यथा आम्ही सोडतो,' असा आक्रमक इशारा देत आंदोलकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. गेल्या १५ ते २० दिवसांपासून पेनटाकळी धरणातील शिल्लक पाणी शेतीसाठी सोडण्याच्या प्रश्नावर चर्चा आणि बैठकांचे सत्र सुरू होते.

मात्र, या चर्चांमधून ठोस निर्णय होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत होती. अखेर केवळ चर्चा आणि राजकीय आरोप-प्रत्यारोपांमधून काहीही निष्पन्न होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर शिवसेनेने आज थेट धरणावर धडक देत आंदोलन केले.

मोर्चादरम्यान आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, गेल्या १५ ते २० दिवसांपासून या विषयावर राजकीय नाट्य सुरू आहे. मात्र, त्यातून शेतकऱ्यांना काहीच मिळत नसल्याने शिवसेना रस्त्यावर उतरली आहे. आता शिवसेना आपल्या पद्धतीने शेतकऱ्यांना पाणी सोडून दाखवेल. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील संनियंत्रण समितीकडे पाणी सोडण्याचा प्रस्ताव असून, या समितीच्या बैठकीत अंतिम निर्णय होणार आहे. येत्या एक-दोन दिवसांत बैठक होण्याची शक्यता असून, त्या बैठकीत सहभागी होऊन शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नावर ठोस निर्णय घेण्याची मागणी आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात बैठकीत सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. पेनटाकळी धरणाच्या निर्मितीसाठी या परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत. त्यांच्या जमिनींमुळेच हे धरण उभे राहिले असून, या धरणातून चिखली, बुलढाणा तसेच खालच्या भागातील तालुक्यांनाही पाणी मिळते. असे असताना स्थानिक शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होता कामा नये. धरणातील पाणीवाटपाबाबत पुरेशी माहिती न घेता वेगवेगळी विधाने करणे दुर्दैवी आहे. आपण या मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी असून, आपल्या शेतकऱ्यांचे हित कशात आहे, याची आपल्याला जाणीव आहे. या प्रश्नावर राजकारण किंवा नाट्य होऊ देणार नाही, असा इशाराही आमदार खरात यांनी दिला. या धडक मोर्चात नगराध्यक्ष किशोर गारोळे, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुकाप्रमुख ड. आकाश घोडे, नगरसेवक अमर घोडे, संजय वडतकर, महिला आघाडीच्या स्वातीताई नवले, दत्ताजी घनवट, संदीप गारोळे, ड. संदीप गवई, दीपक गायकवाड, पवन टाले, विलास शिंदे यांच्यासह असंख्य शिवसैनिक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विविध विभागांचे अधिकारीही उपस्थित होते. यामध्ये कार्यकारी अभियंता कोरखे मॅडम, एसडीओ नगरे, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, ठाणेदार व्यंकटेश आलेवार, तहसीलदार नीलेश मडके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दोन दिवसांत बैठकीचे आश्वासन; आता प्रत्यक्ष पाणी सोडण्याची प्रतीक्षा!

आजच्या धडक मोर्चानंतर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन मिळाले आहे. त्यामुळे या बैठकीत पेनटाकळी धरणातील शिल्लक पाणी शेतीसाठी सोडण्याबाबत कोणता निर्णय होतो, याकडे मेहकर, लोणार परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. केवळ आश्वासन नको, तर प्रत्यक्ष शेतात पाणी पोहोचावे, आमदार सिद्धार्थ यांनी सांगितले.

दिव्यांगांच्या शिक्षण, आरोग्य व सक्षमीकरणासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करा – मंत्री अतुल सावे

दैनिक आपला विदर्भ

मुंबई । प्रतिनिधी : दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वाधार योजना, दिव्यांग बालकांना वेळेत आरोग्यसेवा व उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शीघ्र हस्तक्षेप केंद्रे आणि दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक धोरण तयार करावे, असे निर्देश दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

मंत्रालयात दिव्यांग कल्याण विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणी व नवीन उपक्रमांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मंत्री सावे यांनी या सूचना केल्या. बैठकीला दिव्यांग कल्याण आयुक्त सत्यजित बडे, उपसचिव विष्णूदास घोडके, उपसचिव राजेश गायकवाड, उपायुक्त गाडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना

अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या स्वाधार योजनेच्या धर्तीवर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्वाधार योजना तयार करावी. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांनाही लाभ मिळेल, अशा प्रकारे सुधारित आराखडा तयार करावा. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश मंत्री सावे यांनी दिले.

दिव्यांग बालकांसाठी शीघ्र हस्तक्षेप केंद्रे

दिव्यांग बालकांचे दिव्यांगत्व लवकर ओळखून त्यांना वेळेत आरोग्यसेवा, तपासणी, प्रतिबंधात्मक उपाय आणि आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी योजना तयार करावी. यासाठी आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, महिला व बालविकास विभागांसह संबंधित विभागांचे अभिप्राय तातडीने घेऊन धोरण तयार करावे. शीघ्र हस्तक्षेप केंद्रांच्या माध्यमातून दिव्यांग बालकांना लवकर उपचार व आवश्यक सेवा मिळाल्याने त्यांचे दिव्यांगत्व कमी करण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

दिव्यांग संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना

दिव्यांग व्यक्तींच्या संशोधन, प्रशिक्षण व सक्षमीकरणासाठी स्वतंत्र दिव्यांग संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याबाबत प्रमाणित कार्यप्रणाली तयार करावी. वनार्टी, महाज्योती आदी संस्थांच्या धर्तीवर संस्थेचे मुख्य कार्यालय आणि प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. दिव्यांग कल्याण विभागाच्या उल्हासनगर, विरार आणि वर्धा येथील उपलब्ध जागांचा दिव्यांग प्रशिक्षण संस्थांसाठी उपयोग करण्याबाबत सविस्तर आराखडा तयार करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

नारिंगी अनारकलीमध्ये तेजश्री प्रधानचा पारंपरिक अंदाज

मुंबई । प्रतिनिधी : द्वशक्षरीहीळ झीरवहरप: मराठी मनोरंजनविश्ववातील लोकप्रिय अभिनेत्री तेजश्री प्रधान सध्या तिच्या अभिनयासोबतच तिच्या खास लूकमुळेही चर्चेत आहे. नुकत्याच पार पडलेल्या 'झी मराठी' पुरस्कार सोहळ्यात तेजश्रीने आपल्या पारंपरिक अंदाजाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. नारिंगी रंगाचा सुंदर अनारकली ड्रेस, त्यावर मॅजेन्टा पिंक रंगाची ओढणी आणि आकर्षक दागिने असा तिचा लूक पाहायला मिळाला. तेजश्रीने या सोहळ्यातील काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. तिच्या या फोटोंवर चाहत्यांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

बुलढाण्यात १२ ते १६ नोव्हेंबरदरम्यान राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धा ; राज्यातील १० विभागांतील १४ व १७ वर्षांखालील मुला-मुलींचे संघ सहभागी होणार

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच महाराष्ट्र हॉकी आणि बुलढाणा हॉकी असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने राज्यस्तरीय शालेय हॉकी क्रीडा स्पर्धेचे आयोजन १२ ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सहकार विद्यामंदिर, चिखली रोड, बुलढाणा येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धेत राज्यातील एकूण १० विभागांतील १४ व १७ वर्षांखालील मुला-मुलींचे हॉकी संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक विभागातून मुलांचे व मुलींचे प्रत्येकी १८ खेळाडू, संघ व्यवस्थापक तसेच पंचाधिकारी, स्वयंसेवक आणि विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत.

स्पर्धेचा उद्घाटन समारंभ १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता सहकार विद्यामंदिर, चिखली रोड, बुलढाणा येथे होणार आहे. यावेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषदेचे पदाधिकारी, शिवछत्रपती पुरस्कारार्थी, अमरावती विभागाचे उपसंचालक, हॉकी संघटनेचे पदाधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच क्रीडाप्रेमी उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेत सहभागी खेळाडूंच्या निवासाची व्यवस्था सहकार विद्यामंदिर येथे करण्यात आली असून मुलांच्या निवासासाठी नूतन विद्यालय, मलकापूर येथेही व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धास्थळापासून निवासस्थानापर्यंत खेळाडूंची ने-आण करण्यासाठी यशोधाम पब्लिक स्कूलच्या वतीने स्कूल बसची व्यवस्था करण्यात आली आहे. खेळाडूंच्या भोजनाची व्यवस्था स्पर्धास्थळी करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजन, तक्रार निवारण, उद्घाटन, तांत्रिक, मैदान व्यवस्था, भोजन, निवास, वैद्यकीय, प्रसिद्धी आणि स्वच्छता अशा विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, भोजन पासेस आणि आवश्यक दस्तऐवजांची तयारी अंतिम टप्प्यात आहे.

जिल्ह्यात राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचे आयोजन होत असल्याने जिल्ह्यातील जास्तीत जास्त क्रीडाप्रेमींनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे. तसेच स्थानिक शाळांनी विद्यार्थ्यांना या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी मैदानावर आणण्याचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी केले आहे.

युवा संवाद - Know Your Vote' उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जनजागृती

माय भारत बुलढाणातर्फे येलगाव येथील पंकज लड्ढ इन्स्टिट्यूटमध्ये कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा । प्रतिनिधी : युवकांमध्ये मतदान प्रक्रियेविषयी जागरूकता निर्माण करणे, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित करण्याच्या उद्देशाने माय भारत बुलढाणा, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्यावतीने येलगाव येथील पंकज लड्ढ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट येथे 'युवा संवाद - Know Your Vote' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाला युवा आयकॉन कमलेश सोनवणे, जिल्हा युवा अधिकारी दीक्षा पोमन, संस्थेचे प्राचार्य पद्मनाभ गाडगे, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कार्यक्रम अधिकारी भरत पवार आणि महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. नेहा गवारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा युवा अधिकारी दीक्षा पोमन यांनी विद्यार्थ्यांना माय भारत पोर्टलवरील विविध उपक्रम, युवकांसाठी उपलब्ध असलेल्या सहभागाच्या संधी तसेच विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग (VBYLD) याबाबत मार्गदर्शन केले. युवकांनी सामाजिक आणि राष्ट्रनिर्माणाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून विकसित भारताच्या संकल्पनेत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

युवा आयकॉन कमलेश सोनवणे यांनी विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेची माहिती देतानाच मतदानाचे महत्त्व, मतदार म्हणून नागरिकांची जबाबदारी आणि लोकशाही प्रक्रियेतील सक्रिय सहभाग याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. प्रत्येक नागरिकाने जागरूक मतदार म्हणून आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे प्राचार्य पद्मनाभ गाडगे यांनी विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्य पार पाडण्यासोबतच सामाजिक जाणीव जपण्याचे आणि देशाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या पुढील सत्रात एनएसएस कार्यक्रम अधिकारी भरत पवार यांनी विद्यार्थ्यांना जागरूक नागरिक म्हणून वागण्याची, तर प्रा. नेहा गवारे यांनी लोकशाही मूल्यांचे पालन करण्याची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश्वरी असोले आणि आदित्य इंगळे यांनी केले. उपस्थितांचे आभार मानल्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागरूकता, नागरिकत्वाची जाणीव, लोकशाही मूल्यांप्रती बांधिलकी आणि राष्ट्रनिर्माणातील युवकांच्या सहभागाचा संदेश देण्यात आला.